जंगल डायरी

शिवहार बापूराव कराड



ई साहित्य प्रतिष्ठान

जंगल डायरी

शिवहार बापूराव कराड

ई साहित्य प्रतिष्ठान

जंगल डायरी

शिवहार बापूराव कराड

रा:रुद्धा ता :अहमदपूर

जि:लातुर 413515

9579568997



प्रकाशन : बालनेटाक्षरी

E mail : balnetakshari@gmail.com

9422284116 / 9422249475

मुखपृष्ठ /सजावट : अनघा हिंरे

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

Whatsapp- 9987737237
(ईपुस्तके विनामूल्य मिळण्यासाठी आपले नाव व गांव कळवा)

प्रकाशन : 4 December 2024

प्रस्तावना

जंगल डायरी ,

तरल भावना, निख्खळ मनोरंजन आणि

लडिवाळ सल्ला देणारा बालकविता संग्रह.

अहमदपूर येथील प्रतिथयश ग्रामीण कवी ," यादगिरीकार शिवाजी कराड , यांचा, ' जंगल डायरी ' हा बालकविता संग्रह प्रकाशीत होत आहे. त्याबद्दल प्रथमतः बालसाहित्यीक शिवाजी कराड, यांचे मनापासून अभिनंदन आणि पुढील काव्यप्रवासासाठी खूप खूप शुभेच्छा !

यापूर्वी त्यांचे ,' यादगिरी' अवलिया इ.पुस्तके प्रकाशित आहेत आणि ते चांगल्या पद्धतीने वाचकांच्या पसंतीस उतरले आहेत.

सदर पुस्तकात एकूण 17 कविता असुन जंगलातील प्राण्यांना समोर ठेवून सदर कविता संग्रह तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे .

प्रा.शिवाजी कराड हे गाव खेड्यातील व्यक्तिमत्व असल्याने त्यांनी निसर्ग हा अगदी जवळून अनुभवलेला आहे. त्यामुळे प्राणी आणि पक्षी यांचावर येणारी मानवी संकटे त्यांनी खूप जवळून पाहिले आहेत.

कवी हे पेशाने शिक्षक असल्या कारणाने विद्यार्थ्यांना शिक्षण देत असताना त्यांनी जंगल आणि जंगलातले प्राणी पक्षी तसेच विद्यार्थ्यांची जोड घालण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मानवी अतिक्रमणामुळे जंगली प्राणी आणि पक्ष्यांची निवारे

आणि परिसंस्था नष्ट झाल्या. मानवाच्या स्वार्थी भावने मुळे

अनेक प्राणी आणि पक्षी नष्ट झाले काही प्राणी आणि पक्षी स्थलांतरित झाले.

निसर्ग हा मानवावर अवलंबून नसून मानव हा निसर्गावर पूर्णपणे अवलंबून आहे ही बाब मनुष्य नावाचा प्राणी पूर्णपणे विसरून गेलेला दिसून येतो.

कवीवर्य कराड सरांच्या कविता वाचताना किंवा ऐकताना जंगल सफारी केल्याचा अनुभव प्रतीत होतो.

प्रत्यक्षात जंगलात फिरण्याचा अनुभव या कवितांच्या माध्यमातून येतो.

जंगलात वास्तव्यास असणारे प्राणी आणि त्यांचे अफलातून स्वभाव यांचा मागोवा कवीने जंगल डायरी या कविता संग्रहातून घेतलेला दिसतो. भरणारी शाळा, मोबाईलचा वाढता वापर, वाढता आतंकवाद, वाढती बेकारी एक अनेक प्रश्न प्राण्यांच्या माध्यमातून आदरणीय कवीवर्य

शिवाजी कराड यांनी जंगल डायरी कवितासंग्रहाच्या माध्यमातून मांडण्याचा सुंदर प्रयत्न केलेला आहे.

कविवर्य शिवाजी कराड सरांचा केलेला प्रयत्न नक्कीच पूर्णत्वाकडे जाईल. बालकांना त्यांची जंगल डायरी नक्कीच

आवडेल. त्यांच्या कवितासंग्रहास हार्दिक शुभेच्छा.

धन्यवाद ....!!

प्रा. मुरहारी कराड अहमदपूर

प्रसिद्ध बालसाहित्यीक

अर्पण पत्रिका

अंगात ताप असताना

मंदिराचे चिरे उचलताना

मला विद्येचे महत्त्व पटवून सांगितलस

धमकावत होता गुत्तेदार तुला

तुझे काम बंद...

आणि पसरला अंधकार नजरेपुढे

घागर डोईजड झाली

पाय उचलत नव्हता तुझा

तो पहिलाच सबख होता माझ्यासाठी

काळजी स्वतःची कधीच नव्हती तुला

हात पसरला नाहीस कोणापुढे

लाचार नाहीस झाली

जगलीस स्वाभिमानाने

तुला लढताना मी पाहिलय

तुला संघर्ष करताना पाहिलय

होय ग माझे माय...!

सरस्वतीची दुर्गा होताना मी पाहिलय

धन्य झाले जिवन माझे

लागतो तुझ्या शतबार चरणी

पाहता तुझ्या डोळ्यामधी

भासतेस तु स्वराज्याची हिरकणी...


माय....आणि माझ्यासाठी रक्ताच पाणी करणारे माझे दादा

माझी ही दुसरी यादगिरी "...

तुमच्या चरणी अर्पण...

अनुक्रमाणिका

1) जंगलवाडीचे इंजिनियर
2) एकदा चिमणीला अटॅक आला
3) फौजदार काळा
4) दुष्टसर्पोबा
5) चिमणीचा बाँड
6) हुशार कोल्होबा
7) माकडाची फजिती
8) खंड्या बिचारा
9) वाघोबाची दादागिरी
10) सोन्याची काडी
11) नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न
12) डिजे साळींदर
13) साईंटिस्ट वाघोबा
14) राजाचा चेला
15) सी.आय.डी शिंबा
16) चिउची सर्दी
17) पाखरांची शाळा



❖जंगलवाडीचे इंजिनियर

काल रात्री पडलेल्या पावसान
जंगलवाडीचं गेलय आवसान

कस काय क्लायमेट झाल चेंज बाबा
न मोबाईलची भी गेली मग रेंज बाबा



सगळे पक्षी वेड्यागत करु लागले
मोबाईल नाही म्हणून मरु लागले

कावळे म्हणजे जंगलाची बल्ला
कावकाव करत केला हल्ला गुल्ला



वटवट्याचे डोके गरगरु लागले
घुबडाचे हात थरथरु लागले

जंगलवाडी म्हणजे लई भारी गाव
गावात इंजिनियर होते नाव खंडेराव

खंडेरावांनी मग दाखवली पॉवर
जंगलात उभा केला नवा टॉवर

सिंहाच्या दरबारात मिटला प्रश्न
सर्वांनी केला म्हणे साजरा जश्न




Charlee
MOBILE

❖एकदा चिमणीला अटॅक आला

एकदा चिमणीने केला भलताच कुटाणा
चोरुन आणलाय भला मोठा फुटाणा

वरुन साळसुद पणाचा भलताच आव
एकटीनेच मारलाय फुटाण्यावर ताव



मधमाशीने केले होते पोळे गोळा
चिमणीने ठेवला होता त्यावर डोळा

लोकांच्या नजरेत खटकाय लागली
गाव सोडून उगाच भटकाय लागली




चिमणीने केलेल्या पाहुन काड्या
कावळे साहेबांनी घातल्या बेड्या

दुखाला चिमणीने नाही केले मेंशन
जिवाला लावून घेतले भलते टेंशन


अटॅक आला म्हणे झोपेत मरुन पडली

सारी जंगल वाडी काल धडधड रडली







❖फौजदार काळा

एकदा मोकाट सुटली चोर चार
आना गोंदी मग माजवली फार

एकदा आशात सापान लावली फुस
अन् सशाच्या घराला लागली घुस

घुशीन बीळ मागून कोरल
दोघांनी घरातलं धान्य चोरलं

अशात,

खंड्या नावाचा लाकूडतोड्या
करायला शिकलाय घर फोड्या

कधी पळवी घरातली भांडी
कधी पळवी पक्षांची अंडी

खंड्या जंगलात इतका मातला
दरोडेखोर झालाय जंगलातला



खंड्या घेतोय जीवनाची मजा
बिचार्या पक्षांना देतोय सजा

पोपट्या कोतवालानं बातमी कळवली
साहेबांनी जेलात नेऊन बोबडी वळवली

साहेबांनी मग दाखल केली केस
पाहून तिघांच्या तोंडाला आला फेस




जंगलात फिरतोय फौजदार काळा
पोलीस स्टेशनला लावून टाळा

घेतली नाही जर तिघांची शाळा
नाव नाही सांगणार का .का. काळा


काकांची आता थोडी जास्त सटकली
तीघही दोन दोनदा उचलून पटकली

जंगलाच्या हद्दीवर वाढवल्या गस्ती
जंगलात फिरू लागल्या नामी हस्ती

बंद झालाय जंगलातला गुन्हा
जंगल नांदतय आनंदाने पुन्हा



❖दुष्ट सर्पोबा



एकदा लांडोरीने झुडपात गार
अंडी दिली सुंदर चार चार

पण एके दिवशी आक्रीत घडले
सर्पोबा त्यावर तुटून पडले

मोरोबांची चुकवुन गस्त
सर्पांनी सारीच अंडी केली फस्त

लांडोर बिचारी धड धड रडली
उपाशी पोटी जमिनीवर पडली



दाखल झाला कालच गुन्हा
मुंगूस काकांनी आणला लुना




काकोबांची टोपी लाल
मारून सुजवले सापाचे गाल

असा सर्पोबा दुष्टन पापी
मागू लागला मोरांची माफी



जंगलातल्या प्राण्यांचा झाला फायदा
मुंगूस काकांचा लय कडक कायदा



❖चिमणीचा बाँड

आपण दोघे भाऊ भाऊ
शेतकर्याचे दाणे खाऊ



शेतकऱ्यांनी लावले होते जाळे
त्यात अलगद अडकले दोन बाळे

सुटण्यासाठी तडफडु लागली
धाय मोकलून रडू लागली

चिमणी बिचारी करते काय?
शेतकऱ्याचे धरले पाय



चोरी करणे आहे गुन्हा
करू नये यांनी मग पुन्हा

चिमणीची करतेय पाहून गया वया
शेतकऱ्याच्या काळजात आली माया

चिमणीने बाँड वर दिले लिहून
शेतकरी मग जाळे गेला घेऊन

चिमणीच्या पिल्लांना वाटले गार
आनंद झाला चिऊला फार फार





❖हुशार कोल्होबा

एके दिवशी भल्या सकाळी
कोल्होबाच्या दारी आले चार अवकाळी
जोराने ओरडला दांडग्या वाघ
भिकाड्या कोल्ह्या झोपेतून जाग



लांडगा बोलला उठ पटकन
खाऊन टाकीन एका घासात मटकन
द्यायला बघशील मला जर हुल
करून टाकीन तुझी बत्तीच गुल

तरसाने दाखवले दात फीस्स
अंगावर गेले करून हिस्स
कोल्हा बेचारा भलताच बावरला
शिकलेला होता म्हणून स्वतः सावरला

रान कुत्र्याने दाखवले मोठे मोठे डोळे
कोल्ह्याच्या पोटात उठले गोळे
कोल्ह्याला सूचेना करावी काही
वाचवणारे तर आता कोणीच नाही

चालू केला घरातला संगणक
पाहून आणली वायर टणक
घराच्या भोवती आवळला फास
सुटकेचा एकदा सोडला श्वास

चौघला बसला जबर शॉक
कोल्होबा झाला हसून रॉक
चौघाला कोल्होबाचे डोके कळाले
चौघे पाय लावून धूम पळाले





❖माकडाची फजिती


एकदा आकाश धडधड रडले
पावसाचे थेंब पड पड पडले



नदी तळ्याला पाणी आले
पाखरांच्या ओठी गाणी आले

सूर्य निघाला ऊन आले
सर्व जंगल आनंदून गेले

सिंह म्हणाला पोहणार कोण कोण??
हात उठले फक्त दोन



हत्ती म्हणाला मी ही येणार
खोल पाण्यात मी पोहणार

हत्तीदाच्या पाठीवर मी बसणार
अंन् खोल पाण्यात मी घुसणार


दादा तूच माझी पाणबुडी
लवकर टाकूया पाण्यात उडी

हत्तीने उडी टाकली धाडकन
माकड उंच उडाले भाडकन

हत्तीने घेतली पाण्याची मजा
बिचार्या माकडाला मिळाली सजा

पोहता येईना तर जाऊ नये
पाण्याचा अंत पाहू नये






❖खंड्या बिचारा

खंड्याने पाण्यात जाऊन पार
मासे धरून आणले चार चार



बगळ्यांच्या डोक्यात भलताच कावा
खंड्याच्या माशा वर सांगितला दावा

नको म्हणताना कोर्टात केली दाखल केस
खंड्याला आरोपी म्हणून कोर्टात केला पेश



खंड्या बिचारा रडू लागला
जजच्या पाया पडू लागला



खंड्यावर दाखल झाला चोरीचा गुन्हा
बिचारा पाया पडतोय पुन्हा पुन्हा

ठरले रुपये दहा भरावी लागतील
बगळ्यांचे पाय धारावी लागतील

गाव करी तो राव काय करी
अडला हरी गाढवाचे पाय धरी..





❖वाघोबाची दादागिरी

काल रात्रीला जंगलात मीटिंग ठरली
आणि आज गाव देवीची जत्रा भरली



जत्रेत कोल्होबाने लावले मोठे दुकान
विक्रीला आणल्या बंदुकी छान छान

त्यात वाघोबाने घेतलाय पिस्तूल नवा
करीत सुटलाय जंगलात नुसती हवा

सगळ्यांना म्हणतोय कसा उग नव्हं माय
अं... काय वाटलं तुम्हाली पिस्तूल हाय?

लहानगीच हहाय पण एके फोरटी सेवन हाय
आवाज कशी काढते ...ए ढांय ए ढांय ए ढांय



सशाने लावलाय वाघाच्या दोस्तीला चुना
दाखल केलाय वाघोबावर स्टेशनात गुन्हा

पोलीस प्रमुखांनी केलीय वाघाला अटक
वाघाचं तोंड पडलय पांढर पांढर फटक

दादागिरी करणे नडले पडलं वाघाला महाग
धायमोकलुन रडू लागला आज जेलात वाघ



❖सोन्याची काडी

चिमणीची पिल्लं होती लहान
चिमणीला पडला प्रश्न महान

माझ्या जर घरातला गेला लाईट
आगाऊ पिल मग करतील फाईट



मच्छर लागतील गाणे गाऊ
पिल्ल करतील चिऊ चिऊ चिऊ

पिल्लं आहेत आगाऊ भलती
अंधारात करतील भलतीच गलती

चिमणीने घेतलाय भलताच तान
फिरून पाहिलं रान न् रान

उजडु देत म्हणे श्रावण मास
गंगेवर उगवते गवत खास

सल्ला देऊन उडाला खंड्या
सोबत होता पोपटी बंड्या

चिमणीन केलं गंगा स्नान
काढून टाकला डोक्यातला तान

येत्ताना आणली सोन्याची काडी
उजळून गेली चिमणीची माडी



❖नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न



मोरोबांनी लावली सेटिंग
गावच्या पारावर भरली मिटिंग

बोलू लागला कावळोबा काळा
करूया का म्हणे श्रावणात पोळा

चिमणी बोले ठरलय लग्न
आम्ही बाई आहोत कामात मग्न

नको बाई तुमचा पोळा न् टोळा
काम बघून उठलाय पोटात गोळा



मान हलवली नकारार्थी
चिमणी निघाली भलतीच स्वार्थी

ऐकून कावळोबाचा जीव झाला भोळा
करू म्हणे आधी हिच्या लग्नाचा सोहळा

चिमणीच्या लग्नाची फुटली सुपारी
लगीन ठरलंय भल्या ध्या दुपारी

पारव्यांच्या जोडीने साफ केली माडी
खंड्याने सजवली मोत्याची गाडी

गाडीला बसवले घुंगर चार चार
वरच्या बाजूला फवारे गार

नऊवारी नेसून मैना सजली
आरशात पाहून स्वतःच लाजली

सुतार पक्षाने केलाय प्रेस
राघुने घातलाय नवा ड्रेस

अचानक अवतरली चिमणीच्या घरी
सुंदर सुंदर राणी परी

परीला पाहून झाली भलतीच खुश
झोपेत बदलली चिमणीने कुस

चिऊताई झोपेत धपकन पडली
झोपेतून उठून खूप वेळ रडली

चिमणीच्या लग्नाला लागला नाट
झटक्यात उतरला चिमणीचा थाट

बिचार्या चिमणीचे मोडले लग्न
नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न



❖डिजे साळींदर



साळिंद्राने मांडलाय डीजेवर नाच
अंगातून सुटले काटे पाच पाच



सिंह म्हनाला ओ डॅम इट
सिंहाला केलं काल ॲडमिट



कोल्ह्याचा घाव लई लई खोल
डॉक्टर म्हणाले काहीतरी बोल

लांडगोबाची तुटलीय नस
अन वाघ म्हणतोय उठून बस

अंगात संचार लय नवा जोश
साळिंदर झालय लई मदहोश

अंगावर घेऊन काट्याचा घोस
तरस झालय जागीच बेहोश

शालिंदर झालय नाचण्यात धुंद
मुंगसाने तोंड केलय लाल बुंद





❖साईंटिस्ट वाघोबा

एकदा जंगलात घुसले आतंकवादी चार
रस्त्याने करत निघाले अंधाधुंद गोळीबार

अशातच जंगलात पडली भयंकर थंडी
दोन्हीत तडफडुन प्राणी मेले बाराखंडी

हे कमी होते का अंधश्रद्धेचा आलाय उत
बामण बोले जंगलात घुसलय काळं भूत

भुत म्हणताच गाभणी निलगाय पळाली
काळ्या- निळ्या भाल्याची बोबडी वळाली

सगळ्यांच्या अंगात घुसलं भयंकर भीव
अन कुणाचाच येईना बाबा जिवात जीव

काल आला वाघोबा जंगलाचा होऊन राणा
डिग्री झालता पास अन् होता म्हणे शहाणा

सायन्स शिकला होता दोन लाकडं खेटवली
बिना माचीसची मग जंगलात आग पेटवली

उबीनं मग सगळ्यांचा जिवात जीव आला
त्या दिवशी वाघोबा सर्वांचा लाडका झाला



❖राजाचा चेला



आज कोंबड्याने लवकर दिलीय बाग
अन गुहेत आलाय राजा वाघाला राग

करतोय रोजच हा झोपेचा मोड
आज आता याची मोडतोच खोड

काय करावे राजाला काही सुचेना
राजाला कोंबड्याचे वागणे रुचेना

राजा वाघ,कोल्ह्याच्याजवळ गेला
नकटा कोल्हा होता राजाचा चेला

राजा वाघ अन पुसतोय कोल्हाबाला
आणि कोल्होबाने सल्ला छान दिला



चल राजा बाहेर काढ तुझी शाईन बाईक
तालुक्याहुन विकत आणुया मोठा माईक

वेळेवर ओरडला तर भजन लावायचे
नाहीत जोरात सजणी सजन लावायचे

वाघाने मानला नकट्या कोल्ह्याचा सल्ला
दुसर्या दिवसी सुरु केला स्पिकरचा गुल्ला



सारे कोंबडे ओरडून ओरडून दमुन मेले
स्पीकर च्या नादाने राजाचे मन रमुन गेले







❖सी.आय.डी शिंबा

एकदा एका जंगलात कोर्चुल्या चार
वाघाची शिकार करुन झाल्या फरार

सी.आय.डी अन शिंबाला मग गेला फोन
पछाडला त्यानी जंगलाचा कोन न कोन

बसु देइना ना पोटाच्या मधली भुक
पोटासाठी केलीय म्हणे एवढी चुक

साहेब प्लीज तुमची सटकु देऊ नका
माफी मागतोय आम्हाला फटकु नका

हत्ती दया न मग दिला एकच ठेवून ठोका
जेव्हा पळायला बघु लागल्या बघुन मोका

भालु पंकज ,फेड्रीची झाली होती बडबड
निसटण्यासाठी केली कोर्चुल्यांनी गडबड

एसीपीने ठेवून दिला कानात एक तडका
अभिजीतच्या रागाचा वेगळाच भडका

पुर्वी लांडोरची मोहक चाल आणि अदा
सगळ्या कोर्चुल्या झाल्या पुर्वीवर फिदा

लोंडोरनी खेळला भारी अन् वेगळाच डाव
कोर्चुल्या विसरुन गेल्यात नाव आणि गाव

गोड गोड बोल बोलुन सेल मध्ये नेले
तुडव तुडव तुडवतच जेलमध्ये नेले

कोल्हापूर न्यायालयात मिटींग भरली
चारही कोर्चुल्याला मग फाशी ठरली

रविवारी ठरलाय चारही फाशी देण्याचा वायदा
लई कडक असतो बाबा सीआयडीचा कायदा



❖चिउची सर्दी

एकदा चिमणी उन्हात थिजली
पहिल्या पावसात मनसोक्त भिजली
आणि त्यामुळे चिमणीला सर्दी झाली

ठरले होते चिमणीचे लग्न
चिमणी होती कामात मग्न
चिमणीच्या सदा नाकावर हात
सर्दी सोडीना चिमणीची साथ

झालं ते तर झालं थोडं
सर्दीने धाडलं लग्नात घोडं
झाली ती तर थोडी झाली
सर्दीने चिमणीची फजिती केली



चिमणीच्या नाकातून पाणी गळं
चिमणीचा हात नाकाकडं पळं
तेवढ्यात भारी गडबड झाली
वराडी सारी मंडपात आली

चिमणीने केली भारी कमाल
ऑनलाईन मागवला नवा रुमाल
पाहून सर्दीची बोबडी वळाली
रुमाल पाहून सर्दी धूम पळाली



❖पाखरांची शाळा



पाखरांच्या राज्यात भरली शाळा
शिकवायला आला कावळोबा काळा

पाखरे बिचारी भलतीच भोळी
त्यात कावळोबांची तऱ्हा निराळी

वर्गात झालाय नवाच वाद
कावळोबाच्या प्रश्नाला कोणाची ना साद

पोपटराव त्यात भलते शहाणे
आवाज कशाला रंग पहा म्हणे



साळुंका अक्का ने बंद केले गाणे
चिमण्या ताईंना गिळेनात दाणे

मैना दीदी ने लावलाय गजरा
मैना दीदी वर साऱ्यांच्या नजरा

हळुच पसरून पंख पिसारा
मोरोबांनी मग केला इशारा

कबुतरांनी बांधला चंग
सारा वर्ग झाला नाचण्यात दंग





बालमित्रांनो तुम्हाला पुस्तक कसे वाटले आम्हाला जरूर कळवा. तसेच आपल्याला कोणती कविता जास्त आवडली हे कवीला आठवणीने फोन करून कळवा.

लहान मुलांसाठी लिहिलेले साहित्य आम्ही कायम त्याचे स्वागत करू. योग्य साहित्याचे आम्ही नक्कीच छानशे ई बुक करू.

चला तर मग पाठवा आपले लिखाण पटापट खालील मेल आयडीवर. balnetakshari@gmail.com

तुम्ही मला या संदर्भात फोन सुध्दा करू शकतात.
९४२२२४९४७५
मग छान छान मराठी पुस्तक वाचत रहा आणि छान छान मराठी लिहीत रहा.

अनघा हिरे
संपादक
बालनेटाक्षरी

